# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## राहुल गांधी कमकुवत नेते नाहीत तर देशाचे होणारे पंतप्रधान; सरकारने त्यांच्या मागणीला गांभीर्याने घ्यावं, आदिवासी विद्यार्थी आंदोलकांची मागणी

नागपूर दि.२६ (प्रतिनिधी)- राहुल गांधी हे काही कमकुवत नेते नाहीत, ते देशाचे होणारे पंतप्रधान आहेत, त्यामुळे त्यांनी आदिवासी विद्यार्थ्यांसंदर्भात उचललेल्या प्रश्नांना सरकारने गांभीर्याने घ्यावं, अशी मागणी नागपुरात सुरू असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनातून होऊ लागली आहे. माजी आमदार व शेतकरी संघटनेचे नेते वामनराव चटप यांनी आज आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांची भेट घेतली. नागपुरात विद्यार्थ्यांनी आंदोलन संपुष्टात घेताना सरकारने जी आश्वासने त्यांना दिली होती, त्यांची निर्णयांच्या स्वरूपात अंमलबजावणी केली नाही. म्हणून विदर्भातील विद्यार्थ्यांना पुन्हा आंदोलनाला सुरुवात करावे लागले, असे मत चटप यांनी व्यक्त केले आहे.

दरम्यान, राहुल गांधी देशाचे विरोधी पक्ष नेते आहे, ते होणारे पंतप्रधान आहेत. त्यामुळे त्यांच्या मागणीला सरकारने गांभीर्याने घ्यावं, असंही चटप म्हणाले. तर आमचीही राहुल गांधींकडून अपेक्षा असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केलीय. वसतिगृहात राहण्यासाठीची कमाल वयोमर्यादा शासनाने रद्द केली असली, तरी अजूनही ती फक्त घोषणाच आहे. त्या संदर्भात आधी जाहीर झालेला जीआर रद्द करण्यात आलेला नाही, असा दावा विद्यार्थ्यांनी केला आहे. तर वसतिगृह आणि आश्रमशाळांमधील राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या दुर्दशेबद्दलही सरकार पावलं उचलावी, सुधारणा करावी, अशी मागणी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी केली आहे.


(वर्ष ६५ वे अंक २१६) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.२७ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


# नेपाळमध्ये भोटेकोशी नदीला आलेल्या महापूरात ९५ जणांचा मृत्यू

## मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता; महाप्रलयात १०५ भारतीय पर्यटकांसह ५०० हून अधिक जण बेपत्ता, कोट्यावधीचे आर्थिक नुकसान, बचावकार्य सुरू





काठमांडू दि.२६ (वृत्तसंस्था)- नेपाळमध्ये आलेल्या महापूराने रेसुवा जिल्ह्यात विध्वंस केला आहे. बुधवारी सकाळी रसुवा जिल्ह्यातील भोटेकोशी नदीला आलेल्या भीषण महापुरात हजारो नागरिक वाहून गेले असून नदीकाठची अनेक गावे व घरे पत्त्यांच्या बंगल्यासारखी कोसळली आहेत. या महाप्रलयात नेपाळी माध्यमांनुसार आतापर्यंत ९५ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. असून ५०० हून अधिक जण बेपत्ता आहेत. सध्या घटनास्थळी लष्कराकडून युद्धपातळीवर बचावकार्य सुरू असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. या महाप्रलयात मृतांचा आणि बेपत्ता असलेल्या लोकांचा खरा आकडा समोर येत नसल्याने यामध्ये पुन्हा वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

नेपाळ पर्यटन मंडळाच्या माहितीनुसार, पुरामुळे २९१ परदेशी नागरिक बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. त्यापैकी किमान १०५ भारतीय पर्यटक असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, बचाव पथकांकडून बेपत्ता नागरिक आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांचा शोध सुरू असून, पुरामुळे बाधित भागांमध्ये मदत आणि बचावकार्याला वेग देण्यात आला आहे.

पुरामुळे प्रभावित भागात मोठ्या प्रमाणावर बचाव आणि शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. सुरक्षा दलांकडून पूरग्रस्त वस्त्या, रस्ते आणि इतर पायाभूत सुविधांच्या परिसरात बेपत्ता व्यक्तींचा शोध घेतला जात आहे. नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी सांगितले की, पोलीस आणि लष्करी जवानांसह आपत्कालीन पथके बाधित भागात पाठवण्यात आली आहेत. खालच्या भागात नदीकाठावर राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याचे शाह यांनी सांगितले.

भोटे कोशी नदीकाठच्या वस्त्यांमधील लोकांना सतर्क राहण्याचे आवाहन करताना, नदीकाठच्या लोकांनी विशेष खबरदारी घ्यावी आणि सतर्क राहावे, असे प्रशासनाने सांगितले आहे.

तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, हा महापूर स्थानिक मुसळधार पावसामुळे आलेला नसून तिबेटमध्ये हिमशिखर सरोवर फुटल्याने आला आहे. यामुळे भोटेकोशी आणि त्रिशुली नदीच्या (पान ४ वर)

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांच्याशी फोनवरून संवाद

नेपाळमधील या हृदयद्रावक घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांच्याशी फोनवरून संवाद साधून दुर्घटनेतील जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला.''या कठीण प्रसंगात संपूर्ण भारत देश आपल्या नेपाळी बंधू-भगिनींच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. नेपाळला सर्व प्रकारची मानवी मदत पुरवण्यासाठी भारत पूर्णपणे तयार आहे. बचाव आणि मदतकार्यासाठी दोन्ही देशांची पथके एकमेकांशी सातत्याने संपर्क ठेवून आहेत,'' असे आश्वासन पंतप्रधान मोदी यांनी दिले.

## सायबर फसवणूक झाल्यास तातडीने संपर्क साधा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आवाहन

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- सायबर गुन्हेगारांकडून पोलीस, सीबीआय किंवा न्यायाधीशांच्या नावाने नागरिकांना भीती दाखवून, घाबरवून फसवणूक केली जाते. त्यामुळे नागरिकांनी अशा कोणत्याही प्रकारांना बळी न पडता सायबर झाल्यास तातडीने '१९३०' या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र सायबरच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'डिजिटल अरेस्ट' या सायबर जनजागृती लघुपटाचे आणि '१९३० महाराष्ट्र सायबर अँथम'चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र , मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ श्रीकर परदेशी, पोलीस आयुक्त देवेन भारती, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे , अतिरिक्त पोलीस महासंचालक (सायबर) संजय शिंत्रे, महाराष्ट्र सायबर सेलचे प्रमुख यशस्वी यादव उपस्थित होते. यावेळी लघुपट व १९३० महाराष्ट्र सायबर अँथम मध्ये योगदान देणारे कलाकार आशिष विध्यार्थी, पंकज त्रिपाठी, शरद केळकर, सोनाली बेंद्रे, जावेद जाफरी, गायिका सुनिधी चौहान, मंगेश देसाई, समय रैना आदी कलाकार उपस्थित होते.

## एमपीएससी पेपरफुटी प्रकरणी तीन अधिकारी आणि क्लासचालकासह ६ जण अटकेत

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट-ब पदाच्या परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणात मुंबई गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांसह एकूण सहा जणांना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्यांमध्ये खासगी क्लासचालक, संबंधित उमेदवाराच्या नातेवाईकांसह अन्य व्यक्तींचा समावेश असल्याची माहिती आहे. सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना २ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

या कारवाईमुळे एमपीएससीच्या औषध निरीक्षक परीक्षेतील गैरप्रकाराचा तपास आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. पेपर नेमका कुठून फुटला, तो कोणाच्या माध्यमातून बाहेर गेला, त्याचा लाभ कोणाला मिळाला आणि या संपूर्ण प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

दरम्यान, पेपरफुटीच्या तक्रारी आणि तपासातील निष्कर्षांच्या पार्श्वभूमीवर एमपीएससीने औषध निरीक्षक, गट-ब पदाची संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. आता या पदासाठी फेरपरीक्षा घेतली जाणार असून आधी परीक्षा दिलेल्या उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची गरज भासणार नाही. तसेच फेरपरीक्षेसाठी त्यांच्याकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

औषध निरीक्षक परीक्षेतील प्रश्नपत्रिका बाहेर जाण्याच्या प्रकरणात एमपीएससीमधीलच काही कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. त्यानुसार गुन्हे शाखेने एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांना अटक केली आहे. याशिवाय या प्रकरणाशी संबंधित खासगी व्यक्तींनाही अटक करण्यात आली आहे. यामध्ये क्लासचालक आणि संबंधित परीक्षार्थ्याच्या नातेवाईकाचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. एकूण सहा आरोपींना अटक झाल्यानंतर आता त्यांची कसून चौकशी केली जात आहे.

या चौकशीतून पेपरफुटीची संपूर्ण साखळी उघड होण्याची शक्यता आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ती परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचेपर्यंतच्या प्रक्रियेत कोणकोणत्या व्यक्तींना प्रवेश होता, त्यापैकी कोणाकडून प्रश्नपत्रिका बाहेर गेली आणि ती पुढे कशी पोहोचवण्यात आली, याचा तपास केला जात आहे.

या प्रकरणाच्या (पान ४ वर)

## एमपीएससी अध्यक्ष हे मोठ्या नेत्याचे मित्र; त्यांना घरी पाठवा -रोहित पवार

पुणे दि.२६ (प्रतिनिधी)- अन्न व औषध प्रशासन विभागाच्या औषध निरीक्षक पदाच्या भरती परीक्षेतील गैरप्रकार चव्हाट्यावर आल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. गुन्हे अन्वेषण शाखेच्या तपासात एका उमेदवाराला प्रश्नसंचाचा आधीच लाभ मिळाल्याचे निष्पन्न झाल्याने आयोगाने हा निर्णय घेतला. या निर्णयामुळे लढणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठे यश मिळाले आहे. या संपूर्ण प्रकरणात पहिल्या दिवसापासून आवाज उठवणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) आमदार रोहित पवार यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेत राज्य सरकार आणि एमपीएससीच्या कारभारावर जोरदार हल्लाबोल केला.

विद्यार्थ्यांच्या व्यथा मांडताना रोहित पवार म्हणाले, ''येथे तयारी करणारे अनेक विद्यार्थी शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. आज १०-१२ वर्षे उलटूनही सोयाबीन आणि कापसाचे भाव तेच आहेत, पण महागाई प्रचंड वाढली आहे. चहा आणि पोह्यांच्या किमतीही तिप्पट झाल्या आहेत.'' ''तुमचे आई-वडील स्वतःच्या (पान ४ वर)

## ओबीसी आरक्षण संपविणाऱ्यांच्या विरोधात आमचे आंदोलन, ओबीसींच्या हक्काचा लढा उभा करणार- लक्ष्मण हाके

हिंगोली दि.२६ (प्रतिनिधी)- राज्यात ओबीसी आरक्षण संपविण्याचे काम या राज्यकर्त्यांनी केले असून आरक्षण संपविणाऱ्यांच्या विरोधात ता. १ सप्टेंबर रोजी मुंबई येथे आंदोलन केले जाणार असून यामध्ये हजारो ओबीसी बांधव सहभागी होणार असल्याचा दावा ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी बुधवारी ता. २६ पत्रकारांशी बोलतांना केला आहे.

हिंगोली येथील शासकिय विश्रामगृहात ओबीसी पदाधिकाऱ्यांच्या बैठकी नंतर प्रा. हाके यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ओबीसी आरक्षण समितीचे जिल्हा समन्वयक ॲड. रवी शिंदे, दिनकर कोकरे, एकनाथ कुटे, विलास आघाव, वैजनाथ पावडे, डॉ. नागोराव जांबूतकर, अशोक श्रीरामे यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना प्रा. हाके म्हणाले की, तत्कालीन पंतप्रधान व्हि. पी. सिंग यांनी लागु केलेल्या मंडल आयोगामुळे ओबीसींच्या आयुष्यात नवीन पर्व आले होते. मात्र मागील तीन ते चार वर्षात राजकारण्यांनी, सत्ताधाऱ्यांनी ओबीसींचे आरक्षण संपविले आहे. त्यामुळे ओबीसींवर अन्याय होत असून स्वातंत्र्यांच्या लढ्या प्रमाणे पुन्हा एकदा ओबीसींच्या हक्काचा लढा उभा केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सध्या राज्यात सध्या सत्ताधारी, विरोधक देखील ओबीसींच्या बाजूने बोलण्यास तयार नाहीत. ओबीसींचे आरक्षण संपलेले आहे, मात्र काही जण ओबीसी आरक्षण संपलेले नाही असे सांगत आहेत. त्यांनी ओबीसी आरक्षण कसे संपले नाही हे दाखवून द्यावे असे आव्हान त्यांनी यावेळी दिले. देशात एकीकडे आदिवासी समाजाला राष्ट्रपतीपद देता अन दुसरीकडे आदिवासी तरुणांना विद्यार्थ्यांना १३ दिवस उपोषण करायला लावताय हे पुरोगामी महाराष्ट्राची मान शरमेने खाली जाणारी गोष्ट आहे. समाज कल्याण खात्याचा निधी इतरत्र वळविला जातो याकडे समाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी पुढे येऊन बोलले पाहिजे असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी आमदार प्रसाद लाड, बबनराव तायवाडे यांच्यावरही टिका केली.

## बिल थकल्याने मुंबईत कंत्राटदार गजानन देवकातेंची आत्महत्या

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- मुंबई शहरातून एक अतिशय धक्कादायक बातमी समोर आली आहे. मुंबईमध्ये कंत्राटदार गजानन देवकाते यांनी आत्महत्या करत आपलं जीवन संपवलंय. बिल थकल्या प्रकरणी त्यांनी वर्षभरापूर्वी कार्यकारी अभियंत्यांना पत्रही लिहिलेलं होतं. काम केलं तरी वेळेत बिल मिळत नाही. बिलासाठी दहा वेळा चकरा माराव्या लागत असल्याचा या पात्रात उल्लेख होता. परिणामी सततच्या मानसिक आणि आर्थिक त्रासातून त्यांनी हे टोकाचं पाऊल उचललं असल्याचे बोललं जात आहे. तर सरकारकडे आता ९० कोटी रुपये थकले आहे. अशातच राज्यात पुन्हा एकदा एका कंत्राटदाराने आत्महत्या केल्याच्या घटनेनं मोठी खळबळ उडाली असून राज्यातील ही दुसरी घटना असल्याचे बोललं जात आहे.

दरम्यान, राज्यात गेल्या काही दिवसांपासून ज्या कंत्राटदरांचे बिल थकले आहेत त्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतल्याचे दिसून आलं आहे. तर नुकतीच राज्यातील कंत्राटदरांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेऊन हा विषय त्यांच्या पुढे मांडला होता. असे असताना मुंबईमध्ये कंत्राटदार गजानन देवकाते यांनी आत्महत्या करत आपलं जीवन संपवल्याच्या बातमीने मोठी खळबळ उडाली असून या मुद्द्यवरून राजकारण देखील तापण्याची शक्यता आहे.

## आझाद मैदानाशिवाय मुंबईत आंदोलनाला बंदी; गृह विभागाचे कठोर आदेश लागू

मुंबई दि.२६ (प्रतिनिध)- मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर लक्ष्मण हाके यांनी मुंबईत आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर राज्य सरकारने राजधानीतील आंदोलनांबाबत कठोर नियम लागू केले आहेत. राज्याच्या गृह विभागाने तातडीची अधिसूचना जारी करून आझाद मैदान वगळता मुंबईतील अन्य कोणत्याही ठिकाणी आंदोलन, धरणे किंवा जाहीर सभा घेण्यास बंदी घातली आहे.

आझाद मैदानातही आंदोलनाला अमर्याद काळासाठी परवानगी मिळणार नाही. एका दिवसासाठी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंतच आंदोलन करता येणार असून, त्यानंतर मैदानात थांबता येणार नाही. तसेच एका आंदोलनासाठी जास्तीत जास्त ५,००० आंदोलकांनाच परवानगी असेल.

मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे. सरकारने मागण्या मान्य न केल्यास मुंबईत धडक देण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. दुसरीकडे, ओबीसी आरक्षणाच्या रक्षणासाठी लक्ष्मण हाके यांनी १ सप्टेंबरपासून मुंबईत आंदोलन करण्याचे जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर गृह विभागाच्या नव्या आदेशाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

गृह विभागाच्या आदेशानुसार, मुंबईत आंदोलन करण्यासाठी आझाद मैदान हेच अधिकृत ठिकाण राहणार आहे. या मैदानाव्यतिरिक्त इतर कोणत्याही भागात आंदोलन, धरणे, जाहीर सभा किंवा तत्सम कार्यक्रम घेता येणार नाही. आंदोलनासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या सीमा मुंबई जिमखाना, महापालिका मुख्यालय, हजारीमल सोमाणी मार्ग आणि मेट्रो रेल्वे प्रकल्प क्षेत्र यांच्याशी संबंधित आहेत. या निश्चित व्यवस्थेबाहेर आंदोलन करण्यास परवानगी नसेल. यामुळे मंत्रालय, विधान भवन, आझाद मैदानाबाहेरील प्रमुख रस्ते किंवा अन्य संवेदनशील ठिकाणी मोठा जमाव करून आंदोलन करण्याचा पर्याय आंदोलकांसमोर राहणार नाही.

## मराठा-कुणबी वंशावळ समित्यांना पुन्हा एक वर्षाची मुदतवाढ; अपूर्ण जुळवणी त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा राज्यातील वातावरण चांगलंच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटीत आंदोलनाला सुरुवात करणार आहेत. दरम्यान, त्यापूर्वी सरकाराने मराठा कुणबी प्रमाणपत्रासंदर्भात एक मोठं पाऊल उचलल्याची माहिती समोर आली आहे. कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रासाठीच्या वंशावळ जुळवणी समितीला आणखी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्रासाठी वंशावळ जुळवण्याच्या प्रक्रियेसाठी तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीला मुदतवाढ देण्यात आली आहे. १ जुलै २०२६ ते ३० जून २०२७ पर्यंत समितीचा कार्यकाळ वाढवला आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वंशावळ जुळवणीचे काम अद्याप पूर्ण न झाल्याने शासनाने हा निर्णय घेतल्याची माहिती आहे. त्यामुळे आता मराठा कुणबी प्रमाणपत्राचा मार्ग सुकर होणार का? असा देखील प्रश्न विचारला जातोय. तर अपूर्ण जुळवणी त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश देखील यावेळी देण्यात आले आहे.

## कुंभमेळ्याला ३५ हजार कोटी, पण रुग्णालयांना निधी नाही; वडेट्टीवारांचा सरकारवर हल्लाबोल

अमरावती दि.२६ (प्रतिनिधी)- अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात बालकांच्या मृत्यू प्रकरणावरून राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधारी महायुती सरकारवर अत्यंत तीव्र शब्दांत टीका केली आहे. ''एकीकडे कुंभमेळ्यासाठी ३५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात, पण राज्यातील आरोग्य आणि शिक्षण यंत्रणा बळकट करण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत. हे सरकार आणि इथले लोकप्रतिनिधी पूर्णपणे



असंवेदनशील झाले आहेत,'' असा संताप वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. अमरावती येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी रुग्णालयातील ढिसाळ कारभार, सदोष व्हेंटिलेटर आणि सरकारची उदासिनता यांवरून प्रशासनाला खडे बोल सुनावले.

''२०२२ मध्येही अशीच घटना घडली होती, तेव्हा समिती नेमून एका महिन्यात अहवाल देऊ असे सांगण्यात आले होते. आज चार वर्षे उलटली तरी अहवालाचा पत्ता नाही. आता नऊ बालकांचा मृत्यू झाल्यानंतर पुन्हा एकदा समित्यांचा फार्स केला जात आहे. सरकार फक्त वेळकाढूपणा करत आहे.''

''या निष्काळजीपणाला जबाबदार असणाऱ्यांवर तातडीने सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झालाच पाहिजे. तरच ही यंत्रणा वठणीवर येईल. येत्या आठ दिवसांत सरकारने जबाबदारी निश्चित करून कारवाई न केल्यास आम्ही जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात ठाण मांडून बसू,'' असा इशारा त्यांनी दिला. मृत बालकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २५ लाख रुपये मदत देण्यात यावी. तसेच, केवळ ८,००० रुपये मानधनावर काम करणाऱ्या ज्या कंत्राटी परिचारिकेने स्वतःचा जीव धोक्यात घालून अंधारात ६ बालकांचे प्राण वाचवले, तिला शासनाने ५ लाख रुपयांचे विशेष बक्षीस द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

''मला (पान ४ वर)

## सुट्या तेल विक्रीवरील सरसकट बंदी टळली; मुख्यमंत्र्यांकडून एसओपी तयार करण्याचे निर्देश

मुंबई दि.२६ (प्रतिनिधी)- राज्यात खाद्यपदार्थांमधील भेसळ आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित नियमभंगाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेल्या मोहिमेमुळे सुट्या खाद्यतेलाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर करण्यात आलेल्या कडक कारवाईमुळे छोट्या व्यापाऱ्यांमध्ये आणि रोजच्या गरजेनुसार कमी प्रमाणात तेल खरेदी करणाऱ्या ग्राहकांमध्ये चिंता निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विषयावर चर्चा झाली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरसकट बंदीचा मार्ग न स्वीकारता भेसळ रोखतानाच पारंपरिक तेल व्यवसाय आणि छोट्या ग्राहकांचे हित जपण्यासाठी स्वतंत्र मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाला (पान ४ वर)

# डिजिटल युगातील माणूस आणि माणुसकी

आजचा काळ विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा आहे. गेल्या काही दशकांत जगाने तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली आहे. संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन, सोशल मीडिया आणि आता कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या माध्यमातून मानवी जीवनाचा चेहरामोहराच बदलून गेला आहे. काही वर्षांपूर्वी अशक्य वाटणाऱ्या अनेक गोष्टी आज काही सेकंदांत शक्य होत आहेत. जगातील कोणत्याही कोपऱ्यातील व्यक्तीशी क्षणार्धात संवाद साधता येतो, प्रचंड माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते आणि अनेक कामे यंत्रांच्या सहाय्याने वेगाने पूर्ण केली जात आहेत.

ही प्रगती निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु, तंत्रज्ञानाच्या या झपाट्याने बदलणाऱ्या युगात एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. आपण तंत्रज्ञानाच्या बाबतीत जितके पुढे जात आहोत, तितकेच माणुसकीच्या बाबतीतही पुढे जात आहोत का? आधुनिकतेच्या धावपळीत माणूस अधिक सक्षम झाला असला तरी तो अधिक संवेदनशील, सहृदय आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार झाला आहे का, याचा विचार करण्याची गरज आहे.

**तंत्रज्ञानाची क्रांती आणि बदलते जीवन**

तंत्रज्ञानाने मानवी जीवन अधिक सोपे आणि वेगवान केले आहे. बँकिंग व्यवहार घरबसल्या होतात. शिक्षणासाठी ऑनलाइन व्यासपीठे उपलब्ध आहेत. आरोग्यसेवांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानामुळे अचूक निदान आणि उपचार शक्य झाले आहेत. शासकीय सेवांमध्ये डिजिटल प्रणालीमुळे पारदर्शकता आणि गती वाढली आहे. शेतीपासून उद्योगापर्यंत आणि पत्रकारितेपासून शिक्षणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत आहे.

विशेषतः इंटरनेटने ज्ञानाचे लोकशाहीकरण केले आहे. पूर्वी ग्रंथालये, महागडी पुस्तके किंवा विशिष्ट संस्थांमध्ये मर्यादित असलेली माहिती आज सर्वसामान्यांच्या हातातील मोबाईलवर उपलब्ध झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यालाही जगातील नामांकित विद्यापीठांच्या शैक्षणिक साधनांपर्यंत पोहोचता येते. नव्या पिढीसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत.

परंतु, तंत्रज्ञानाची ही क्रांती माणसाच्या विचारांमध्ये आणि वर्तनातही बदल घडवून आणत आहे. सोयी वाढल्या आहेत; मात्र संयम कमी होताना दिसतो. माहिती वाढली आहे; पण विचार करण्याची क्षमता किती वाढली, हा प्रश्न आहे. संपर्क वाढला आहे; पण नात्यांमधील संवाद कमी होत आहे. आभासी जग मोठे झाले आहे; मात्र वास्तवातील माणसे एकमेकांपासून दूर जात आहेत.

आज अनेक कुटुंबांमध्ये एक विचित्र चित्र दिसते. एकाच घरात राहणारे कुटुंबीय शारीरिकदृष्ट्या जवळ असतात, पण मानसिकदृष्ट्या एकमेकांपासून दूर असतात. प्रत्येकाच्या हातात मोबाईल असतो आणि प्रत्येकजण आपापल्या डिजिटल विश्वात व्यस्त असतो. संवादासाठी संदेश आहेत, व्हिडिओ कॉल आहेत, सोशल मीडिया आहे; पण प्रत्यक्ष संवादासाठी वेळ कमी होत आहे.

पूर्वी कुटुंबातील सदस्य एकत्र बसून चर्चा करत, सुख-दुःख वाटून घेत आणि एकमेकांच्या भावनांना समजून घेत. आज त्या जागी अनेकदा डिजिटल पडद्याने स्थान घेतले आहे. वाढदिवसाच्या शुभेच्छा सोशल मीडियावर दिल्या जातात, दुःखद प्रसंगावर प्रतिक्रियाही डिजिटल स्वरूपात व्यक्त केली जाते. संवादाचा वेग वाढला; पण भावनांची खोली कमी होऊ नये, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

तंत्रज्ञानाचा वापर माणसाला जोडण्यासाठी व्हायला हवा, तो माणसांमधील अंतर वाढविण्यासाठी नव्हे. मोबाईल हातात असणे चुकीचे नाही; परंतु मोबाईलमुळे समोरच्या व्यक्तीशी संवादच हरवणे ही चिंतेची बाब आहे. सोशल मीडियाने प्रत्येकाला अभिव्यक्तीचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. सामान्य नागरिकही आपले मत जगासमोर मांडू शकतो. सामाजिक प्रश्नांवर चर्चा होऊ शकते, अन्यायाविरोधात आवाज उठविता येतो आणि लोकहिताच्या मोहिमा व्यापक स्तरावर राबविता येतात. अनेक सामाजिक चळवळी आणि जनजागृती उपक्रमांमध्ये सोशल मीडियाने सकारात्मक भूमिका बजावली आहे.

मात्र, या माध्यमांचा गैरवापरही वाढत आहे. कोणतीही माहिती पडताळणी न करता पुढे पाठविण्याची सवय गंभीर समस्या बनली आहे. अफवा, बनावट माहिती, द्वेषपूर्ण संदेश आणि बदनामीकारक मजकूर मोठ्या वेगाने पसरतो. एखाद्या व्यक्तीची प्रतिमा खराब करण्यासाठी खोटी माहिती वापरली जाते. जात, धर्म, भाषा आणि राजकीय मतभेदांच्या आधारावर समाजात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न होतात. डिजिटल माध्यमांवर मिळालेले स्वातंत्र्य हे अमर्यादित नसून जबाबदारीशी जोडलेले आहे. प्रत्येक नागरिकाने कोणतीही माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे आवश्यक आहे. 'फॉरवर्ड करण्यापूर्वी विचार करा' हा नियम प्रत्येक डिजिटल नागरिकाने स्वीकारला पाहिजे.

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय ही आजच्या काळातील सर्वांत मोठी तांत्रिक क्रांती मानली जात आहे. शिक्षण, वैद्यकीय सेवा, उद्योग, प्रशासन, संशोधन, शेती, पत्रकारिता आणि अनेक क्षेत्रांमध्ये एआयचा वापर वाढत आहे. मोठ्या प्रमाणातील माहितीचे विश्लेषण, भाषांतर, लेखन, संशोधन आणि अनेक कामे कमी वेळात पूर्ण करण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरत आहे. मात्र, प्रत्येक नव्या तंत्रज्ञानासोबत काही प्रश्नही निर्माण होतात. रोजगाराचे स्वरूप बदलणार आहे. अनेक पारंपरिक कौशल्यांची गरज कमी होऊ शकते. बनावट छायाचित्रे, व्हिडिओ आणि आवाज तयार करून फसवणूक करण्याची शक्यता वाढत आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाचा विकास जितका आवश्यक आहे, तितकेच त्याचे नैतिक आणि जबाबदार नियमनही महत्त्वाचे आहे.

एआयकडे ज्ञान आणि माहिती असू शकते; पण माणसाच्या हृदयातील संवेदना त्याच्याकडे नसतात. यंत्र निर्णयासाठी माहितीचे विश्लेषण करू शकते; पण आईच्या ममतेची, दुःखी व्यक्तीच्या वेदनेची किंवा उपेक्षितांच्या संघर्षाची खरी अनुभूती यंत्राला येऊ शकत नाही. म्हणूनच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासासोबत मानवी बुद्धिमत्ता, विवेक आणि नैतिकता यांना अधिक महत्त्व द्यावे लागेल. तंत्रज्ञान सर्वांसाठी उपलब्ध झाले आहे, असे म्हणणे सोपे आहे; परंतु प्रत्यक्षात समाजातील प्रत्येक घटकाला समान डिजिटल सुविधा उपलब्ध नाहीत. शहर आणि ग्रामीण भाग, श्रीमंत आणि गरीब, सुशिक्षित आणि अशिक्षित यांच्यामध्ये डिजिटल साधनांच्या उपलब्धतेत मोठी तफावत दिसते. अनेक कुटुंबांकडे आधुनिक उपकरणे नाहीत, काही भागांत इंटरनेटची सुविधा मर्यादित आहे, तर अनेकांना डिजिटल तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर कसा करावा, याचे प्रशिक्षण नाही. त्यामुळे डिजिटल प्रगतीचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविणे ही सरकार, सामाजिक संस्था आणि नागरिकांची सामूहिक जबाबदारी आहे. जर तंत्रज्ञानाचा लाभ केवळ काही वर्गांपुरता मर्यादित राहिला, तर सामाजिक विषमता अधिक वाढू शकते. डिजिटल भारताची संकल्पना तेव्हाच यशस्वी होईल, जेव्हा ग्रामीण, गरीब आणि वंचित घटकांनाही समान संधी मिळतील.

# सरकारने जेन-झी ला राजकारणाशी जोडून किंवा संवाद साधून चालणार नाही;तर त्यांच्या वेदनांचा, भावनांचा,भविष्याचा,शिक्षणाचा व रोजगाराचा गांभीर्याने विचार करावा

**जेन-झी** वर होत असलेला अन्याय असह्य झाल्याने त्यांची अन्यायाविरुद्धची आक्रमकता अती तिव्र झाली आहे.त्यामुळे सरकारला घाम सुटल्याचे दिसून येते.यामुळे देशात जनुकाय जेन-झी ची सुनामी आली की काय अशी सरकारला भीती वाटत आहे आणि जेन-झी च्या भीतीने सरकार,संपूर्ण सत्ताधारी राजकीय पक्ष व पक्ष-विपक्षाचे पुढारी जेन-झी ला आपलेसे करण्याच्या मार्गावर लागले आहेत.परंतु जेन-झी च्या वेदना, दुःख,डिस्टर्ब होत असलेली मानसिकता आणि त्यांच्या गंभीर समस्यांकडे सरकार जातीने लक्ष देण्यास तयार नाहीत. जेन-झी च्या मुलभूत मागण्यांकडे सरकार दुर्लक्ष करीत असून राजकीय पोळी शेकण्याचे काम करीत आहे ही बाब स्पष्ट दिसून येते.भारत स्वतंत्र झाला.परंतु आजही राजकीय पुढारी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यात मोठी तफावत दिसून येते व सरकारकडून मोठ्या प्रमाणात भेदभाव होतांना आपण पहातो.सध्याच्या परिस्थितीत जेन-झी आक्रमक झाली आहे कारण राजकीय पुढाऱ्यांनी वाममार्गाने करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती कमवून देशाचे व जेन-झी चे वाटोळे केले आहे.जेन-झी चे सरकारला एकच सांगणे आहे की,सरकारी शाळा-महाविद्यालये सर्वांसाठी आहे त्यामुळे सर्वप्रथम सरकारी शाळा-महाविद्यालयामध्ये राजकीय पुढाऱ्यांचे व उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची मुले शिकला पाहिजे, त्याचप्रमाणे सरकारने आरोग्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात योजना व सुविधा जाहीर केल्या आहेत त्यामुळे सर्वसामान्यांनप्रमाणे राजकीय पुढाऱ्यांनी सुध्दा सरकारी रुग्णालयाचा लाभ घ्यावा यामुळे सर्वसामान्य नागरिक व राजकीय पुढारी यात किती मोठी दरी सरकारने निर्माण केली आहे याचे चित्र स्पष्ट देशाला दिसून येईल. आज युवा पिढीला अभ्यास, पेन, पेंन्सील, पुस्तक व वह्यांची गरज आहे.परंतु युवा पिढीवर होत असलेला अन्याय असह्य झाल्याने त्यांना नाईलाजास्तव आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागला ही अत्यंत दुःखद बाब आहे. जंतरमंतर येथे झालेल्या जेन-झी च्या आंदोलनामुळे सरकार जागे झाले आणि त्या अनुषंगाने संघ प्रमुख मोहनजी भागवत यांनी सर्वप्रथम जेन-झी सोबत संवाद साधला आणि आता सरकारने सर्वच राजकीय पुढाऱ्यांना व मंत्र्यांना जेन-झी शी संवाद साधण्याचे आदेश दिले आहेत.याच पार्श्वभूमीवर विरोधी पक्ष सुध्दा सध्या जेन-झी सोबत संवाद साधायला सुरुवात केली आहे.यावरून स्पष्ट होते की, सरकारला व राजकीय पुढाऱ्यांना जेन-झी ची ताकद समजायला लागली आहे.सरकारला कदापि वाटत नव्हते की, जेन-झी एवढ्या संख्येने रस्त्यावर येईल.परंतू आजच्या परिस्थितीत जेन-झी च्या वेदना असह्य झाल्या आहे याची जाणीव सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.आतापर्यंत सरकारने, राजकीय पुढाऱ्यांनी व पक्ष-विपक्षांनी जेन-झी ला वापरून घेतले व याचे दुष्परिणाम जेन-झी ला जाणवू लागले याचाच परिणाम देशासह जगाने जंतरमंतरवरील आंदोलन उघड्या डोळ्यांनी पाहीले.त्याचाच परिणाम म्हणजे आज सरकार व पक्ष विपक्ष जेन-झी समोर नतमस्तक होतांना आपण पहातो.जेनझीचा वापर आतापर्यंत राजकीय पुढाऱ्यांनी भरपूर करून घेतला व सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे अनेक विद्यार्थ्यांनी व बेरोजगाराना नुकसान झाले व आत्महत्या सुध्दा कराव्या लागल्या.परंतु जेन-झी आता जागृत झाली आहे.सरकारला व राजकीय पुढाऱ्यांना अजुनपर्यंत जेन-झी च्या वेदना समजल्याच नाही. कारण देशात आज मोठ्या प्रमाणात शिक्षण व्यवस्था ढासळली असुन त्याचा बट्ट्याबोळ झाला आहे. कारण जी शिक्षण व्यवस्था सर्वसामान्यांसाठी आहे त्यात मोठ्या प्रमाणात भेदभाव दिसून येतो.त्यामध्ये राजकीय पुढाऱ्यांचे मुले, आमदार-खासदारांचे मुले किंवा सरकारमध्ये असलेल्या मंत्र्यांचे किंवा उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची मुले यात मोडतच नाही त्यामुळे सर्वसामान्यांच्या मुलांच्या वेदना सरकार किंवा राजकीय पुढारी समजूच शकत नाही.कारण यांची मुले विदेशात किंवा उच्च खाजगी शिक्षण संस्थांनामध्ये किंवा शाळा-महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असतात आणि त्याचे प्रायश्चित्त आज देशातील जेन-झी ला पेपर फुटीच्या रूपात भोगावी लागते आहे.आज जेन-झीच्या वेदना असह्य झाल्याने संपूर्ण देशभर जेन-झी सरकारला धारेवर धरतांना दिसत आहे. आज महाराष्ट्रातील ३६२११ खाजगी कंपन्यां बंद झाल्याचे सांगितले जाते. उदाहरण द्यायचे झाले तर महाराष्ट्राची उपराजधानी आणि भौगोलिक दृष्ट्या देशाचा केंद्रबिंदु समजल्या जाणाऱ्या नागपूरमध्ये एम्प्रेमिल आणि मॉडेलमील या दोन मोठ्या कंपन्या होत्या व यामध्ये १० हजार पेक्षा अधिक कामगारांना रोजगार मिळत होता.परंतु त्यावेळच्या सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी या दोन्ही कंपन्या बंद केल्या व आज याच जागेवर गगनचुंबी इमारती व मॉल दिसुन येते.यावरून आपण समजू शकतो की,देशातील कितीतरी कंपन्या राजकीय हेतूने आणि स्वतःच्या स्वार्थासाठी सरकारने किंवा राजकीय पुढाऱ्यांनी बंद पडल्या असतील.आजच्या परिस्थितीत देशातील अनेक कंपन्यांचा कामाचा तास ८ तासावरून १२ तास करण्यात आलेला आहे यामुळे कामगारांचे आयुमर्यादा घटण्याचे प्रमाण वाढू शकते व आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. अशामुळे सुध्दा अनेक कारखाने व कंपन्या बंद होतांना दिसत आहे. काही कारखानदारांनी आपल्या कंपनीला दिवाळखोरी घोषित करून बंद केल्या आहेत. त्याचप्रमाणे देशातील अनेक खाजगी कंपन्या तोट्यात चालत असल्याचे सांगून देशातील हजारो कंपन्या बंद होत आहे व त्याठिकाणी गगनचुंबी इमारती व मॉल तयार करून मोठ्या प्रमाणात फ्लॅट स्किम दिसून येते. एकीकडे सरकार कंपन्या उभारणीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात जंगलतोड करीत आहे; तर दुसरीकडे कंपन्या बंद करून मोठ्या प्रमाणात सरकारच्या मार्फत राजकीय पुढारी फ्लॅट स्किम तयार करीत आहे.अशा परिस्थितीत देशात रोजगार येईल कोठून याचाही विचार सरकारने करायला हवा. सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे जेन-झी पुढे मोठी रोजगारीची समस्या निर्माण झाली आहे.त्याचप्रमाणे शिक्षण प्रणालीचा सुध्दा बट्ट्याबोळ झाल्याचे दिसून येते.'यूनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर एज्युकेशन प्लस'(यूडाइस) च्या आकडेवारीनुसार देशातील १४ लाख ६६ हजार ६८२ शाळांमध्ये ६८.४ टक्के राज्य सरकारांव्दारे संचालित आहे. यातील १ लाख ८४३ शाळा अशा आहे की,त्याठीकाणी फक्त एका शिक्षकाच्या भरोशावर शाळा चालत आहे.या शाळांतील विद्यार्थ्यांचा विचार केला तर या शाळेत २९ लाख १२ हजार १४७ विद्यार्थी शिकत आहेत.अशाप्रकारे देशातील शाळांची गंभीर समस्या आहेत.त्यामुळेच राजकीय पुढारी व उच्च पदस्थ अधिकारी आपल्या मुलांना विदेशात किंवा खासगी शाळांमध्ये टाकून सरकारी शाळांपासुन पळ काढतांना दिसतात त्याचा परिणाम जेन-झी ला किंवा जेन अल्फा ला भोगावा लागतो आहे. देशातील जेन-झीवर होत असलेला अन्याय लक्षात घेता सरकारने त्यांच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.कारण जेन-झी च्या समस्यांमुळे त्यांचा परिवार विचलित होतो आणि त्याचा गंभीर परिणाम संपूर्ण परिवाराला भोगावा लागतो.देशातील ४ हजार पेक्षा जास्त आजी-माजी आमदार-खासदारांवर गुन्हे आहेत काहींनवर गंभीर गुन्हे आहेत तरी त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कठोर कारवाई नाहीच.परंतू जेन-झी न्यायासाठी लढत असतांना त्यांच्यावर बळाचा वापर,पायलट गनचा वापर व एके-४७ चा वापर होतो म्हणजे हा भविष्यावर घणाघाती प्रहार समजावा लागेल आणि ही लोकशाहीला काळीमा फासणारी घटना म्हणावी लागेल.या संपूर्ण घटनांची दखल घेऊन सरकारने, महामहीम राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष यांनी जेन-झीसाठी समाधानकारक मार्ग काढून त्यांना योग्य न्याय द्यावा,अशी मी विनंती करतो.जय हिंद!

– **रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )

# ८.७ कोटी हिंदुस्थानी तरुण शिक्षण, रोजगार आणि प्रशिक्षणापासून दूर; नीती आयोगाच्या अहवालातून धक्कादायक वास्तव

**देशातील** तब्बल ८.७ कोटी तरुण शिक्षण, रोजगार आणि प्रशिक्षणापासून दूर असल्याचे नीती आयोगाच्या अहवालातून समोर आले आहे. १५ ते २९ वयोगटातील या तरुणांकडे सध्या ना रोजगार आहे, ना शिक्षण सुरू आहे आणि ना ते कोणतेही कौशल्य प्रशिक्षण घेत आहेत. २०२१ मध्ये झालेल्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या (NSS) ७८व्या फेरीतील आकडेवारीच्या आधारे हा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. नीती आयोगाच्या 'Reimagining Skilling for Viksit Bharat@2047' या अहवालात देशातील कौशल्यविकासासमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाय मांडण्यात आले आहेत.

या तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अनुदानित कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची गरज असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. स्थानिक पातळीवरील रोजगाराच्या मागणीनुसार तसेच नव्याने विकसित होत असलेल्या क्षेत्रांशी संबंधित कौशल्ये तरुणांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना स्वयंरोजगाराकडे वळण्यास आणि उत्पन्नाचे स्थिर साधन निर्माण करण्यास मदत होऊ शकते.

देशातील कामगार आणि विद्यार्थ्यांचे नीती आयोगाने पाच व्यापक गटांमध्ये वर्गीकरण केले आहे. त्यात शालेय शिक्षण घेणारे, उच्च शिक्षण घेणारे, औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्रात काम करणारे, शिक्षण-रोजगार-प्रशिक्षणापासून दूर असलेले तरुण आणि महिला यांचा समावेश आहे.

या तरुणांसमोर आर्थिक अडचणी अधिक गंभीर असल्याचे अहवालात म्हटले आहे. त्यांच्या हातात कोणतेही उत्पन्न नसते; त्याच वेळी यापूर्वीच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेला खर्च हा त्यांच्यासाठी आर्थिक भार ठरतो. त्यामुळे शिक्षणानंतर अतिरिक्त कौशल्य प्रशिक्षण घेण्यासाठी पैसे खर्च करणे त्यांना अनेकदा शक्य होत नाही.

मउत्पन्नाचा अभाव आणि आधीच्या शिक्षणावर झालेला खर्च यामुळे या तरुणांवर आर्थिक मर्यादा येतात,फ असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. महाविद्यालयीन शिक्षण आणि अनेकदा खासगी शिकवणीचा खर्च सुरू असताना त्यावर आणखी पैसे देऊन कौशल्य प्रशिक्षण घेणे विद्यार्थ्यांना परवडत नाही.

'उत्पन्नाचा अभाव आणि आधीच्या शिक्षणावर झालेला खर्च यामुळे या तरुणांवर आर्थिक मर्यादा येतात,' असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. महाविद्यालयीन शिक्षण आणि अनेकदा खासगी शिकवणीचा खर्च सुरू असताना त्यावर आणखी पैसे देऊन कौशल्य प्रशिक्षण घेणे विद्यार्थ्यांना परवडत नाही.

**कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील विद्यार्थ्यांवर अधिक परिणाम**

कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन शिक्षणाचा खर्च, त्यासोबत खासगी शिकवणी आणि त्यावर अतिरिक्त कौशल्य प्रशिक्षणाचा खर्च करणे विशेषतः कठीण ठरते. त्यामुळे पारंपरिक पदवी अभ्यासक्रमासोबत रोजगारक्षम कौशल्यांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी त्यांच्याकडे मर्यादित आर्थिक पर्याय उरतात.

शिक्षण पूर्ण केल्यानंतर काही पदवीधर कुटुंबाला आर्थिक मदत करण्यासाठी उत्पन्न मिळवून देणारी कोणतीही औपचारिक नोकरी स्वीकारतात. नोकरी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेशी संबंधित किंवा चांगल्या पगाराची असण्याची गरज नसते. स्थिर उत्पन्न मिळावे यासाठी कमी पगाराची नोकरीही स्वीकारण्याची वेळ अनेकांवर येते.

**पदवी असूनही योग्य नोकरी मिळत नाही**

देशातील शिक्षण आणि रोजगार यांच्यातील तफावतही अहवालातून अधोरेखित झाली आहे. केवळ ८.२५ टक्के पदवीधरांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेशी सुसंगत रोजगार मिळतो, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तरुणांकडे पदवी असली तरी प्रत्यक्ष कामासाठी आवश्यक कौशल्ये आणि उद्योगांच्या गरजांशी संबंधित प्रशिक्षणाचा अभाव असल्याने त्यांची रोजगारक्षमता प्रभावित होते. शिक्षणव्यवस्थेत व्यावहारिक शिक्षणाचा मर्यादित समावेश आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाचा अभाव ही या समस्येची महत्त्वाची कारणे असल्याचे नीती आयोगाने म्हटले आहे.

त्यामुळे केवळ पारंपरिक पदवी देण्याऐवजी स्थानिक रोजगाराच्या गरजा, उदयोन्मुख उद्योग आणि स्वयंरोजगाराच्या संधी यांच्याशी जोडलेले कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची गरज अहवालातून अधोरेखित करण्यात आली आहे.

# भारतीय वायुदलाच्या करिअर मार्गदर्शनातून ४० हजार विद्यार्थ्यांना 'आकाशाला गवसणी'चे स्वप्न

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १,२०० शाळांमध्ये प्रोजेक्टरद्वारे थेट प्रक्षेपण; फ्लाईंग ऑफिसर मुस्कान सिंह यांच्याशी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त संवाद

छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांना भारतीय वायुदलातील विविध करिअरच्या संधी, प्रवेश प्रक्रिया, प्रशिक्षण, शिस्त, साहस आणि देशसेवेच्या संधींची माहिती मिळावी, या उद्देशाने भारतीय वायुदल करिअर मार्गदर्शनङ्ग या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून जिल्ह्यातील तब्बल १,२०० शाळांमधील सुमारे ४०,००० विद्यार्थ्यांनी शाळांमध्ये मोठ्या स्क्रीन व प्रोजेक्टरच्या माध्यमातून एकत्रितपणे हा कार्यक्रम पाहिला.





या कार्यक्रमात एअर फोर्स स्टेशन, लोहेगाव येथील फ्लाईंग ऑफिसर मुस्कान सिंह यांनी विद्यार्थ्यांना भारतीय वायुदलातील करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. तसेच मास्टर वॉरंट ऑफिसर देवेश कुमार यांनीही विद्यार्थ्यांना आवश्यक माहिती दिली.

फ्लाईंग ऑफिसर मुस्कान सिंह यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना भारतीय वायुदलात प्रवेश करण्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध मार्गांची माहिती सोप्या व प्रेरणादायी पद्धतीने दिली. इयत्ता १० वी व १२ वी नंतर भारतीय वायुदलात प्रवेश करण्याच्या संधी, NDA प्रवेश, PCM विषयांचे महत्त्व, UPSC मार्फत होणारी प्रक्रिया, SSB मुलाखत व निवड प्रक्रिया, NCC विशेष प्रवेश योजना तसेच एरोनॉटिकल इंजिनिअरिंगसारख्या तांत्रिक क्षेत्रातील संधी याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी भारतीय वायुदलातील अधिकारी म्हणून काम करण्याचा अनुभव, प्रशिक्षण, विमान उड्डाण, तांत्रिक व ग्राउंड ड्युटी, साहसी क्रीडा, शिस्तबद्ध जीवनशैली आणि देशसेवेच्या विविध संधींबाबत उत्सुकतेने प्रश्न विचारले. फ्लाईंग ऑफिसर मुस्कान सिंह यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना अत्यंत सहज, आत्मीय आणि प्रेरणादायी पद्धतीने उत्तरे दिली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय वायुदलात करिअर करण्याबाबत मोठी उत्सुकता आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश केवळ वायुदलातील नोकरीच्या संधींची माहिती देणे हा नसून विद्यार्थ्यांमध्ये देशसेवा, शिस्त, धैर्य, नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना आणि मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा निर्माण करणे हा होता. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांचा उत्साह आणि सहभाग उल्लेखनीय होता.

जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही भारतीय वायुदलातील करिअरची माहिती एकाच वेळी उपलब्ध व्हावी, यासाठी शाळास्तरावर प्रोजेक्टर व मोठ्या स्क्रीनद्वारे कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. त्यामुळे एका केंद्रस्थानी आयोजित कार्यक्रमाचा लाभ एकाच वेळी जिल्ह्यातील १,२०० शाळांमधील सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला. या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना थेट वायुदलाच्या अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन मिळण्याची संधी उपलब्ध झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. पी. एम. मिन्नू (भा. से. प्र.), जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांच्या नेतृत्वात शिक्षण विभागाच्या प्राथमिक व माध्यमिक विभागाने नियोजन केले.मा. अध्यक्ष जि. प. श्री अविनाश गलांडे यांनी शुभेच्छा दिल्या. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी. एम.जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मा. श्री. जितेंद्र जयस्वाल आणि शिक्षण सभापती मा. श्रीमती अनिताताई मोठे व ज्ञानेश्वर पाटील मोठे यांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती.

भानुदासराव चव्हाण सभागृह या ठिकाणी कार्यक्रम आयोजित होता. व युट्युब चॅनल वरून संपूर्ण जिल्हयातील उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्य. शाळांसाठी ९ वी ते १२ च्या विद्यार्थ्यांसाठी online live होता.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मीही भारतीय वायुदलात अधिकारी होऊ शकतो/शकते. हा आत्मविश्वास मिळाला असून, जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या करिअरविषयक क्षितिजाला नवी दिशा देणारा हा कार्यक्रम ठरला आहे.

# जुना सरकारी रस्ता मोकळा करून देण्यासाठी तालुक्यातील सावखेडगंगा येथे गेल्या पांच दिवसापासून महिलांचे पोषण



वैजापूर, दि. २६ (प्रतिनिधी) – तालुक्यातील सावखेडगंगा येथील सरकारी रस्त्यावर अतिक्रमण करून संबंधितांनी गिळंकृत करून तो रस्ता बंद केला ज्यामुळे उपोषण कर्त्यांना शेतात जाण्यासाठी रस्ता नाही ,त्यांची जमीन पडीक पडलेली आहे, हा रस्ता त्वरित मोकळा करावा व आम्हाला शेती करू द्यावी यासाठी सावखेडगंगा येथे मिनाबाई ज्ञानेश्वर नरोडे गट .न.१४२, मथुराबाई राधाजी नरोडे,गट न.१४२ भागीरथीबाई बबनराव पोटे गट न,१७६,-१७७ तसेच सविता अंबादास तुपे व मंदाबाई भाऊसाहेब न्हावले या गेल्या पांच दिवसापासून गिळकृत केलेला रस्ता मोकळा करून द्यावा म्हणून गावाबाहेर परिसरात उपोषण करीत आहेत.

विशेष म्हणजे या परिवारातील दोन युवक भारतीय सैन्य दलात सीमेवर कार्यरत असून त्यांच्या परिवारातील महिलांना उपोषणाची वेळ आली आहे.या महिलांनी दि२०ऑगस्ट,२०२६रोजी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पालकमंत्री, पोलीस स्टेशन विरगाव व ग्राम पंचायत ला अर्ज देऊन विनंती केली की, मौजे सावखेडगंगा ते हिंगोणी हा दोन गावाना जोडणारा रस्ता व शेतकऱ्यांसाठी गाडी मार्ग म्हणून वापरात असलेला रस्ता तसेच नकाशात शीटमध्ये नमूद असलेला रस्ता लगतच्या शेतकऱ्यांनी अतिक्रमण करून वहीत खाली आणलेला रस्ता गिळकृत केलेला आहे. हा १५ फूट रस्ता त्वरित अतिक्रमण मुक्त करून वाहिवाटी साठी उपलब्ध करून द्यावा व आम्हाला शेतीत जाण्यासाठी मार्ग उपलब्ध करून द्यावा म्हणून उपोषण आरंभ केलेले आहे, यापूर्वी अनेकदा विनंती अर्ज करून ही प्रशासनाने दखल घेतली नाही म्हणून उपोषण मार्ग अवलंबला असे निवेदनात नमूद केले आहे.

मात्र पांच दिवस उलटले तरी अद्याप त्यांच्या उपोषणाची वरिष्ठांनी दखल घेतलेली दिसून येत नाही.गावाबाहेर जंगलात या महिला उपोषण करीत आहेत. रात्री या परिसरात हिंस्त्र पशु वावरतात, या महिलाच आहेत काहीही विपरीत घडू शकते. शासनाने याची त्वरित दखल घ्यावी म्हणून वैजापूर येथील ऑल इंडिया सेंट्रल पॅरॅमिल्ट्री फोर्सेस एक्स सर्व्हीस मेन वेल्फ ेअर असोसिएशन महाराष्ट्र चे सेक्रेटरी मेजर गौतम गायकवाड, अध्यक्ष सोपान देवकर, सदस्य सोपान गाढे व नितीन त्रिभुवन तसेच सामाजिक कार्यकर्ते ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांनी बुधवार(ता.२६) रोजी उपोषण स्थळी भेट देऊन त्या सर्व उपोषण कर्त्या भगिनींना धीर देत आम्ही तुमच्या पाठीशी आहोत कारण आपले उपोषण सनदशीर व कायदेशीर आहे.

तुम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी आमची संघटना तुमच्या पाठीशी आहे असे आश्वासन युक्त पत्र ही त्यांना दिले. या प्रसंगी गावकरी मोठ्या संख्येने जमले होते.

# एक महिन्यातच भूमिगत नालीची दुरवस्था; तक्रार करूनही प्रशासनाची डोळेझाक?



जडगांव, ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली दि. २६ (प्रतिनिधी) – शासनाच्या निधीतून जनतेच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या भूमिगत सिमेंट काँक्रीट नाली बांधकामाची अवघ्या एका महिन्यातच दुरवस्था झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या निकृष्ट बांधकामाबाबत तक्रार अर्ज देऊन तब्बल एक महिना उलटला असूनही प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

जडगांव येथील दलित वस्तीमध्ये ग्राम पंचायतीमार्फत करण्यात आलेल्या भूमिगत नाली बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याचा आरोप असून, कामाची गुणवत्ता व प्रत्यक्ष खर्च याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकारी, कर्मचारी, ग्राम पंचायत पदाधिकारी व संबंधित कंत्राटदारांविरुद्ध कठोर कारवाई तसेच आवश्यक असल्यास फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात ॲड. सुनील बगाटे यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. मात्र तक्रार देऊन एक महिना उलटूनही कोणतीही ठोस चौकशी किंवा कारवाई झालेली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तक्रार करूनही प्रशासन गप्प का? संबंधित अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना पाठीशी घातले जात आहे का?ङ्क असा संतप्त सवाल आता जडगांव ग्रामस्थांमधून उपस्थित होत आहे.

जनतेच्या करातून मिळालेला शासनाचा निधी हा विकासकामांसाठी असतो. मात्र अवघ्या एका महिन्यात बांधकामाची दुरवस्था होत असेल, तर कामाची गुणवत्ता तपासणारे अधिकारी, मोजमाप करणारे कर्मचारी आणि देयके मंजूर करणाऱ्या यंत्रणेची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. प्रशासनाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्यास निकृष्ट काम करणाऱ्यांना अप्रत्यक्षपणे संरक्षण मिळत असल्याचा संदेश जनतेमध्ये जात आहे.

याबाबत ॲड. सुनील बगाटे यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देताना म्हटले, प्रशासनाला जर जनतेच्या पैशातून दर्जेदार विकासकामे करून घ्यायची नसतील आणि निकृष्ट कामांकडे डोळेझाकच करायची असेल, तर शासनाने दिलेला निधी थेट अधिकारी, कर्मचारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्या खात्यावरच खर्च करण्यासाठी द्यावा.

किमान जनतेचा पैसा अशा निकृष्ट कामांमध्ये वाया जाणार नाही. तक्रार अर्जाला एक महिना उलटूनही कारवाई नाही; आता तरी प्रशासन जागे होणार का? असा सवाल जडगांव ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात असून, या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

# श्रेया घोषाल यांची ‘ आशा भोसले ‘ पुरस्कारासाठी निवड



पुणे दि. २६ ( प्रतिनिधी ) – अ. भा. मराठी नाट्य परिषद ( पिंपरी चिंचवड शाखा ) , पिंपरी चिंचवड कलारंग प्रतिष्ठान आणि सिद्धिविनायक ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा ,‘आशा भोसले ‘ या मानाच्या पुरस्कासाठी ख्यातनाम गायिका श्रेया घोषाल हिची निवड करण्यात आली आहे. एक लाख अकरा हजार रुपये, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून शनिवार दि. २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजता रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती अ. भा. मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या सोहळ्याला विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे, ज्येष्ठ संगीतकार हृदयनाथ मंगेशकर, आ. अमित गोरखे, मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष योगेश बहल यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने मोरया थिएटर निर्मित ‘ आशा से श्रेया तक ‘ या सदाबहार गीतांच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा विनामूल्य असून पिंपरी चिंचवड शहरातील रसिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन भाऊसाहेब भोईर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला आ. भा. नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे उपाध्यक्ष किरण येवलेकर तसेच गौरी लोंढे, सुदाम परब, राजेंद्र बंग, संतोष शिंदे, संतोष रासने आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# Gen-Z च्या आंदोलनांमुळे देशात लोकशाही जिवंत राहील, 'दिमागी नक्षल' लेबल त्यांना रोखू शकत नाही - माजी न्यायमूर्ती एस. मुरलीधर

नवी दिल्ली, दि. २६ (वृत्तसंस्था) – शांततापूर्ण आंदोलकांना दिमागी नक्षल म्हणून हिणवणे किंवा सरकारला अस्थिर करण्याचे षड्यंत्र रचल्याचा आरोप करणे, या गोष्टी देशातील तरुण पिढीला थांबवू शकत नाहीत. जंतर-मंतरवर नुकतीच झालेली जेन झी आंदोलने ही हिंदुस्थानात लोकशाही सुरक्षित आणि जिवंत राहण्याचे मोठे आश्वासक चिन्ह आहे, असे ठाम प्रतिपादन ओडिशा उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती आणि ज्येष्ठ वकील डॉ. एस. मुरलीधर यांनी केले आहे. २८ व्या डी. एस. बोरकर मेमोरियल लेक्चरमध्ये ‘माझे हिंदुस्थानातील व्हिजन’ या विषयावर ते बोलत होते. ‘लाईव्ह लॉ’ने याबाबत वृत्त दिले आहे.

नीट पेपरफुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील गोंधळाविरोधात जेन-झी पिढी रस्त्यावर उतरली. जुलै महिन्यात दिल्लीतील जंतर-मंतर येथे मोठे आंदोलनही झाले. यामुळे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामाही द्यावा लागला. या आंदोलनाचा डॉ. एस. मुरलीधर यांनी उल्लेख केला.

जेन-झीची नुकतीच झालेली आंदोलने आश्वस्त करणारी आहेत. आजची युवा पिढी पोकळ आश्वासने किंवा चिथावणीखोर वक्तव्यांना बळी पडणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. दिमागी नक्षल म्हणून बदनाम करूनही ते डगमगले नाहीत. प्रश्न विचारण्याची ताकद, करुणा, सत्याग्रह आणि उत्तम विनोदबुद्धी ही या जेन-झीची वैशिष्ट्ये आहेत, असे ते म्हणाले.

सरकार किंवा सत्ताधाऱ्यांवर केलेली प्रामाणिक टीका, व्यंगचित्रे किंवा स्टैंड-अप कॉमेडियनचे विनोद यांना गुन्हेगारीचे रूप दिले नाही, तरच २०४७ चा हिंदुस्थान अधिक मजबूत होईल. मूलभूत हक्कांच्या मागणीसाठी शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्या नागरिकांवर कायदे शस्त्रांसारखे वापरणे आणि त्यांना सरकार पाडण्याचे षड्यंत्र मानणे बंद केले पाहिजे, अशी टीकाही डॉ. एस. मुरलीधर यांनी केली.

**फास्ट-ट्रॅक कोर्ट हा केवळ देखावा?**

पेपर लीक प्रकरणांसाठी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याच्या सरकारच्या घोषणेवर त्यांनी प्रश्न उपस्थित केले. नवीन न्यायालये स्थापन न करता विद्यमान न्यायाधीशांवरच अतिरिक्त जबाबदारी दिली जाते. मेघालयासारख्या ठिकाणी एकच न्यायाधीश स्पेशल कोर्ट, सीबीआय कोर्ट आणि कमर्शियल कोर्ट अशा वेगवेगळ्या भूमिका बजावतो. यामुळे प्रश्न सुटण्याऐवजी न्यायव्यवस्थेवरील ताण अधिक वाढतो, असा टोला त्यांनी लगावला.

# वैजापूरात ईद-ए-मिलाद स्नेह,उत्साह , बंधुभाव शांतता फेरीने उत्साहात संपन्न



वैजापूर, दि. २६ (प्रतिनिधी) – शहरातील सर्व मुस्लिम बांधव व हिंदू बांधव यांनी एकत्र येत एक- दुसऱ्याना ईद-ए-मिलाद सणानिमित्त शुभेच्छा देऊन ईद-ए-मिलाद उत्सव आनंदात व उत्साहात बुधवार(ता,२६)रोजी साजरा केला. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रझा मस्जिद परिसरात सर्व मुस्लिम बांधव एकत्र जमले या ठिकाणी रथात मुफ्ती तय्यब रशीद साहब व सय्यद जुबैर साहब यांना रथात बसवून मिरवणूक आरंभ झाली. माजी उपनगराध्यक्ष मजीद शेठ कुरैशी, विद्यमान नगरसेवक हमीद कुरेशी, आमीरअली, सदर ए काझी हाफीजोद्दीन, रहीम शेख, बिलाल सौदागर, अकबर सय्यद शेख, ठाकूर धोंडीरामसिह राजपूत, काझी इनामदार, मन्सूरअली, अल्ताफ बाबा यांच्या उपस्थितीत ही मिरवणूक आरंभ झाली. शहराच्या मुख्य रस्त्यावरून ही मिरवणूक हातात झेंडे घेऊन व शांततेत घोषणा देत. जामा मस्जिद जवळ आल्यावर नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, जेष्ठ नेते व समाज कार्यकर्ते अखिल शेठ, उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख, प्रशांत पा. सदाफळ, वैजापूर किराणा संघ अध्यक्ष प्रकाशशेठ बोथरा, विनोद राजपूत, अल्ताफ बाबा, बाबासाहेब गायकवाड, सदर काझी, राजू काझी, ॲड.अली, अकबर भाई, गयास मामु, धोंडीरामसिंह ठाकूर यांनी रथातील मुफ्ती तय्यब रशीद साहब,व सय्यद जुबेर साहब यांचे शाल अर्पण करून स्वागत केले,डॉ.दिनेश परदेशी यांनी उपस्थिताना ईद-ए-मिलाद च्या शुभेच्छा दिल्या. उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सोनावणे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता,त्याना मेटे यांनी सहकार्य केले तसेच विशेष पोलीस दस्ता ही बंदोबस्तसाठी होता.

# कांद्याची दिल्लीवारी ! लासलगावहून ८४० टन कांदा दिल्लीला रवाना होणार

नवी दिल्ली, दि. २६ (वृत्तसंस्था) – देशांतर्गत बाजारात कांद्याचे दर ६० ते ७० रुपये किलोपर्यंत पोहोचल्याने ग्राहकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने बफर स्टॉकमधील कांदा बाजारात आणण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून लासलगाव रेल्वे स्थानकातून ८४० टन कांदा दिल्लीला पाठविण्यात येत आहे. यासाठी २१ बोगींची मालगाडी लासलगाव रेल्वे मालधक्क्यावर दाखल झाली होती. मात्र, कांद्याची प्रतवारी आणि पॅकिंगचे काम वेळेत पूर्ण न झाल्याने ही मालगाडी तब्बल १६ तास मालधक्क्यावरच थांबून होती. मंगळवारी सायंकाळी पॅकिंग केलेला कांदा दाखल झाल्यानंतर मालगाडीमध्ये कांदा भरण्याचे काम सुरू करण्यात आले. ही मालगाडी बुधवारी दिल्लीच्या दिशेने रवाना होणार आहे. दिल्लीपाठोपाठ देशातील इतर प्रमुख शहरांमध्येही रेल्वेच्या माध्यमातून कांदा पाठवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कोलकाता, गुवाहाटी, चेन्नई आणि कोचीन या शहरांसाठी लासलगाव, निफाड आणि मनमाड येथून कांदा पाठविला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, निफाडहून गुवाहाटीकडे जाणारी नियोजित मालगाडी रद्द करण्यात आली असून, इतर शहरांसाठी या आठवड्यात कांदा रवाना होण्याची शक्यता आहे.

# नवनियुक्त प्राथमिक शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे यांचा ज्ञान संदीप शिक्षण संस्थेकडून सत्कार



छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) : जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या प्राथमिक शिक्षणाधिकारीपदी नव्याने नियुक्त झालेले संघरत्न सरोदे यांचा ज्ञान संदीप शिक्षण संस्थेच्या वतीने सत्कार करून त्यांना पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांच्या हस्ते सरोदे यांचा शाल, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान स्वाक्षरीचे तैलचित्र तसेच डॉ. शेखर मगर यांनी संपादित केलेला ‘प्रकाश सोनवणे : वंचितांचा ज्ञानदीप’ हा गौरवग्रंथ भेट देऊन सन्मान करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून आयु. संघरत्न सरोदे यांनी नव्याने पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचा ज्ञान संदीप शिक्षण संस्थेच्या वतीने हा सत्कार करण्यात आला. प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील नव्या जबाबदारीसाठी त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी शिक्षण विभागातील कर्तव्यदक्ष प्रशासनाधिकारी प्रदीप भैय्या राठोड, उपशिक्षणाधिकारी श्रीमती नीता श्रीश्रीमाळ, संत तुकाराम प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप सोनवणे, ज्ञान संदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अभिजीत सोनवणे तसेच किरणकुमार सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नूतन प्राथमिक शिक्षणाधिकारी सरोदे यांचे अभिनंदन केले. संस्थेच्या वतीने तसेच महाराष्ट्र राज्य खाजगी प्राथमिक मुख्याध्यापक संघटनेच्या वतीने त्यांना पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. सत्कार समारंभ प्रसंगी शिक्षण क्षेत्राशी संबंधित विविध विषयांवरही चर्चा करण्यात आली. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे, शाळांमधील शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम करणे आणि शिक्षकांच्या सहकार्याने जिल्ह्यातील शिक्षण व्यवस्थेला नवी दिशा देणे, या दृष्टीने आगामी काळात सकारात्मक काम होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## शैक्षणिक क्षेत्रातील विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार; संघरत्न सरोदे

सत्काराला उत्तर देताना प्राथमिक शिक्षणाधिकारी आयु. संघरत्न सरोदे यांनी संस्थेच्या वतीने करण्यात आलेल्या स्वागताबद्दल आनंद व्यक्त केला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांच्या सहकार्याने काम करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## प्राथमिक शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा भक्कम पाया : प्रा. प्रकाश सोनवणे

प्रा. प्रकाश सोनवणे यांनी सरोदे यांना नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा देताना प्राथमिक शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचा भक्कम आणि मजबूत पाया असल्याचे सांगितले. प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना दर्जेदार, संस्कारक्षम आणि मूल्याधिष्ठित शिक्षण मिळणे अत्यंत महत्त्वाचे असून, याच स्तरावर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी होत असते, असे त्यांनी नमूद केले. जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी-केंद्रित करण्यासाठी सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज असल्याचेही ते म्हणाले. ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचविण्यासाठी शैक्षणिक प्रशासन, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक आणि सामाजिक संस्थांनी समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचे मत प्रकाश सोनवणे यांनी व्यक्त केले.

# उचलली जीभ लावली टाळूला - खवड्या डोंगराच्या दुर्घटनेवर अफवांचे पेव!

छत्रपती संभाजीनगर, दि. २६ (प्रतिनिधी) – तिसगावच्या खवड्या डोंगरावर घडलेली ती घटना अंगावर काटा आणणारी होती. १८ वर्षाच्या कुणाल चांदवडे आणि त्याला वाचवायला गेलेल्या त्याच्या आई-वडिलांचा – मुरलीधर आणि संगीता चांदवडे यांचा एकाच दिवशी दुर्दैवी अंत झाला. संपूर्ण शहर हळहळत असताना, सोशल मीडियावर मात्र दुसराच खेळ सुरू झाला.

घटनेचे सत्य समोर येण्याआधीच, मोबाईलच्या स्क्रीनवर कथा तयार झाल्या.

अफवांचे पीक – कोणी म्हणाले – ‘आयफोनचे हफ्ते थकले म्हणून आत्महत्या केली.‘

कोणी म्हणाले – ‘नवीन आयफोन १६ पाहिजे होता, वडिलांनी नाही दिला म्हणून टोकाचे पाऊल उचलले.‘

चांगले शिकलेले, समजदार म्हणवणारे रील स्टार्स सुद्धा कोणतीही शहानिशा न करता, ‘भावपूर्ण श्रद्धांजली‘ चा टॅग लावून हेच व्हिडिओ व्हायरल करू लागले. व्ह्यूज मिळाले, लाईक्स मिळाले, पण एका कुटुंबाच्या दुःखाचा बाजार झाला. खरे तर वाळूज पोलिसांनीच स्पष्ट केले आहे की आयफोन हे कारण नव्हते. प्राथमिक तपासात हा कौटुंबिक वादातून घडलेला प्रकार असल्याचे समोर आले आहे. पण सत्य येईपर्यंत खोटे गावभर फिरून आले होते.

आपण कधी सुधारणार?–

१. घटना घडते ती एका घरात, पण शिक्षा मिळते अफवेतून: त्या मेलेल्या मुलाला आता ’आयफोनसाठी जीव दिला’ म्हणून कायमचे लेबल लागले. त्याच्या आई-वडिलांच्या संस्कारावर प्रश्नचिन्ह उभे राहिले.

२. रीलची जबाबदारी कधी समजणार? तुमच्याकडे ५० हजार फॉलोअर्स आहेत म्हणजे तुम्ही पत्रकार नाही झाला. एका व्हिडिओने हजारो लोकांचा समज बिघडतो. खात्री न करता व्हिडिओ बनवणे हे देखील एक प्रकारचे हिंसाचारच आहे.

३. लाइव्ह दुःखाचा तमाशा नको : खवड्या डोंगरावर ३ तास लोक त्याला समजावत होते. तिथे मदत करण्याऐवजी अनेकांनी मोबाईल काढून लाइव्ह केले. आपण माणुसकी विसरून कंटेंट हंटर झालो आहोत का?

खवड्या डोंगराची ही घटना आपल्याला दोन गोष्टी शिकवते. एक – आपल्या जवळच्या मुलांचे, मित्रांचे मन ऐका, छोटा वाद वाटला तरी संवाद ठेवा. आणि दोन – उचलली जीभ लावली टाळूला हे बंद करा. एखादी बातमी शेअर करण्याआधी एकदा विचारा – हे खरे आहे का? याचा सोर्स काय? यामुळे कोणाचे नुकसान तर होणार नाही ना? नाहीतर उद्या अशाच एखाद्या अफवेचा बळी आपणही होऊ शकतो.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# ईद-ए-मिलादुन्नबी सणानिमित्त शहरात जूलूस-ए-मोहंमदी उत्साहात

## जुलूसमध्ये हजारो नागरिकांचा सहभाग, बालकांमध्ये उत्साह





छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- ईद-ए-मिलादुन्नबी सणानिमित्त बुधवारी शहरात जुलूस-ए-मोहम्मदीचे आयोजन करण्यात आले. जुलूसमध्ये हजारो नागरिक, विद्यार्थी, विविध सामाजिक व धार्मिक संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. बालकांनी हातात झेंडे घेत मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला. संपूर्ण जुलूसदरम्यान शांतता व शिस्तीचे वातावरण पाहायला मिळाले.

शहरातील नशेचा कारोबार मुळापासून संपविण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून युद्धपातळीवर कारवाई सुरू आहे. नशेच्या व्यवसायासह शहराचे वातावरण खराब करणाऱ्या समाजकंटकांची माहिती नागरिकांनी पोलिसांना द्यावी आणि युवा पिढीला या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी केले.

जुलूस-ए-मोहम्मदी व्यवस्थापन कमिटीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही पैगंबर हजरत मोहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या जन्मदिनानिमित्त जुलूसचे आयोजन करण्यात आले. कमिटीचे संयोजक डॉ. शेख मुर्तुजा यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.

जुलूस सुरू होण्यापूर्वी निजामुद्दीन चौक येथे पोलीस प्रशासनाच्या वतीने उभारण्यात आलेल्या मंचावरून पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी नागरिकांना संबोधित केले. मागील वर्षीही याच मंचावरून नागरिकांना नशेच्या पदार्थांचा व्यवसाय करणाऱ्यांची माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानंतर शहरातील विविध भागांत कारवाई करून काही आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली. मात्र, अपेक्षित प्रमाणात नागरिकांचे सहकार्य मिळाले नसल्याचे सांगत भविष्यात पोलिसांना अधिक सहकार्य मिळेल, अशी अपेक्षा पवार यांनी व्यक्त केली. नशेच्या व्यवसायाबाबत माहिती देण्यासाठी नागरिकांनी पोलीस आयुक्तांचा वैयक्तिक मोबाईल क्रमांक ९२२६५१४००१ यावर संपर्क साधावा किंवा पोलीस आयुक्त कार्यालयात येऊन निर्भयपणे तक्रार करावी, असे आवाहन त्यांनी केले. माहिती देणाऱ्या नागरिकांची ओळख गुप्त ठेवण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी संयोजक डॉ. शेख मुर्तुजा यांनी जुलूस-ए-मोहम्मदीची माहिती देत नागरिकांनी अमन, शांतता व पूर्ण शिस्तीचे पालन करून जुलूसमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यानंतर पोलीस प्रशासनाच्या वतीने कमिटीच्या जबाबदार पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते जुलूसला सुरुवात करण्यात आली.

यावेळी पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर, सहायक पोलिस आयुक्त सागर देशमुख, सहायक पोलिस आयुक्त साईनाथ ठोंबरे, सिटी चौक पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती निर्मला परदेशी यांच्यासह विविध पोलीस अधिकारी, तसेच कमिटीचे जबाबदार असदउल्ला तर्रार, आरेफ काजी, मजहर शुत्तारी, हामेदउल्ला खान तर्रार, डॉ. अशफाक इकबाल, नगरसेवक रशीद खान मामू, नवीन ओबेरॉय, हुसैन रजा, हाजी ईसा कुरेशी, मुश्ताक अहमद आदी उपस्थित होते.

जुलूस शहागंज येथून निघून संस्थान गणपती, राजाबाजार, नवाबपुरा चौक, निजामुद्दीन चौक, चंपा चौक, शहाबाजार, चेलीपुरा, मंजूरपुरा, मोमिनपुरा, लोटा कारंजा, देवडी बाजार, कबाडीपुरा, बुढ्ढीलेन, जुनाबाजार, सिटी चौक, सराफा, गांधी पुतळा मार्गे पुन्हा निजामुद्दीन चौक येथे पोहोचला. येथे असदउल्ला खान तर्रार यांच्या दुआ व सलामनंतर जुलूसची सांगता करण्यात आली.

जुलूसदरम्यान शहरातील विविध ठिकाणी ११ ठिकाणी परचम कुशाई (ध्वजारोहण) करण्यात आले. निजामुद्दीन चौक, शहाबाजार, मंजूरपुरा, लोटा कारंजा, देवडी बाजार, कबाडीपुरा, बुढ्ढीलेन, जुनाबाजार, सिटी चौक आदी परिसरात संयोजक डॉ. शेख मुर्तुजा यांच्या हस्ते परचम कुशाई करण्यात आली. देवडी बाजार परिसरात बोहरा समाजाच्या वतीने समाजाचे धर्मगुरू व मुकर्रम बागवाला यांच्या उपस्थितीत पारंपरिक पद्धतीने जुलूसचे स्वागत करण्यात आले. तर कबाडीपुरा परिसरात शिया समाजाच्या वतीने मुशीर हुसैन आदींच्या उपस्थितीत स्वागत करण्यात आले. सिटी चौक परिसरात युवकांनी फुलांची उधळण करून जुलूसचे स्वागत केले. ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने शहरातील विविध परिसरात, विशेषतः जुलूसच्या मार्गावर नागरिकांसाठी भोजन, शरबत, नमकीन आदींची व्यवस्था करण्यात आली होती. जुलूसदरम्यान नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभागी होत एकमेकांना सणाच्या शुभेच्छा दिल्या. रात्री उशिरापर्यंत शहरात ईदच्या आनंदाचे वातावरण कायम होते.

राजाबाजार परिसरात समाजसेवक राजू पिंपळे यांच्या वतीने गेल्या आठ वर्षांपासून जुलूस-ए-मोहम्मदीच्या स्वागतासाठी मिठाईचे वाटप केले जाते. यंदाही ही परंपरा कायम ठेवण्यात आली. जुलूसच्या मार्गावर अन्नदान, पाणी वाटप, मिठाई वाटप, शितपेय व शरबत वाटप करण्यात आले. यावेळी पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी राजू पिंपळे यांच्या उपक्रमाचे कौतुक करून सामाजिक एकता व बंधुभाव कायम ठेवण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल अभिनंदन केले. एकूणच, जुलूस-ए-मोहम्मदीच्या माध्यमातून शहरात अमन, शांतता, सामाजिक एकता आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.

# ईद-ए-मिलादुन्नबी सणानिमित्त शहरात ५ हजार शितपेय वाटपाचा विक्रम

## आय लव औरंगाबाद फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम; पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- ईद-ए-मिलादुन्नबी सणानिमित्त शहरात दरवर्षीप्रमाणे यंदाही बंधुभावाचा संदेश देण्यासाठी निजामुद्दीन चौक, शहागंज येथून भव्य जुलूस-ए-मोहंमदीचे आयोजन करण्यात आले होते. भोजनदान, पाणी व शरबत वाटप, थंड शितपेय वाटप, रक्तदान शिबीर व आरोग्य शिबीराचे आयोजन शहरात करण्यात आले होते. या जुलूसमध्ये पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्यासह पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जुलूसमध्ये सहभागी होणारे भाविक शहरातील विविध भागांतून सुमारे १० ते १५ किलोमीटर पायी प्रवास करतात. त्यामुळे भाविकांची तहान भागविण्यासाठी सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या आय लव औरंगाबाद फाऊंडेशनच्या वतीने जुना बाजार येथे तब्बल ५ हजार शीतपेयांचे वाटप करण्याचा विक्रम केला.

फाऊंडेशनचे अध्यक्ष इरबाज अन्सारी यांच्या पुढाकाराने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आलेल्या शीतपेय वाटपाचा शुभारंभ पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमाचे शहरवासीयांकडून कौतुक होत आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी ईद-ए-मिलादुन्नबीच्या शुभेच्छा देत युवकांनी नशेपासून दूर राहून शिक्षणाकडे वळावे, असा महत्त्वपूर्ण संदेश दिला. समाजातील युवकांनी शिक्षण, प्रगती आणि सकारात्मक कार्याला प्राधान्य देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या प्रसंगी उर्दू दैनिक हिंदुस्थानचे संपादक नायाब अन्सारी, नगरसेवक नवीन ओबेरॉय, डीसीपी पंकज अतुलकर, एसीपी सागर देशमुख, एसीपी साईनाथ ठोंबरे, सिटी चौक पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती निर्मला परदेशी, नजीब खान, ताआमिरे मिल्लत ग्रुपचे अब्दुल मोहिद हशर, मलिक हशर, नवेरा हशर, डॉ. शादाब शेख, मनाल काझी, मिर्झा अफसर यांच्यासह आय लव औरंगाबाद फाऊंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# नेपाळ येथे अडकलेल्या नागरिकांसाठी मदत

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या भीषण पुरामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, तेथे विविध देशांतील व राज्यातील अनेक पर्यटक अडकले आहेत. या पार्श्वभूमीवर, तेथे अडकलेल्या नागरिकांची माहिती संकलित करण्यासाठी आणि त्यांना तात्काळ आवश्यक ती मदत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (मंत्रालय, मुंबई) यांच्यातर्फे खालील लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे:

**माहिती नोंदवण्यासाठी लिंक :** https://geospatial.mahaseoc.in/Sahayata_gulf/

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन**

जर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कोणतेही नागरिक किंवा पर्यटक नेपाळमध्ये अडकले असतील , तर त्यांच्या कुटुंबातील सदस्य किंवा नातेवाईकांनी वरील लिंकवर जाऊन त्यांची सविस्तर माहिती भरावी,असे आवाहन श्री. विनय गौडा जी. सी., जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर ०२४०-२३३१०७७, मोबाईल - ७३५०३३५१०४

# कचरा विकून उत्पन्न मिळवणारी राज्यातील पहिली महापालिका बनण्याचा संकल्प; भंगाराचे होणार ई-ऑक्शन

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी)- कचऱ्यातून महापालिकेला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकते याची खात्री पटली आहे. त्यादृष्टीने महापालिका प्रशासनाने पाऊल उचलण्यास सुरुवात केली. पुढील काही दिवसांत कचरा विकून उत्पन्न मिळवणारी महापालिका म्हणून आपली ख्याती असेल असे घनकचरा विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांनी मनपा सर्वसाधारण सभेत सांगितले.

१५ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधी कचरा संकलन आणि वाहतुकीसाठी खर्च करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सर्वसाधारण सभेसमोर ठेवला होता. तब्बल दीड तास या विषयावर चर्चा सुरू होती. सध्या गुजरात येथील वेस्टर्न इमॅजिनरी कंपनीची नेमणूक मनपाने केली. त्यामुळे खर्च अधिक वाढला, घंटागाड्यांची संख्या, कचऱ्यावर प्रक्रिया आदी अनेक मुद्यांवरून नगरसेवकांनी प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. नगरसेवक गोकुळ मलके, विजय औताडे आणि राजगौरव वानखेडे, रामेश्वर भादवे, अनिता घोडेले, शिवाजी दांडगे, संगिता सांगळे यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनावर आरोप सुरू केले. पूर्वी रेड्डी कंपनीला दरमहा साडेतीन कोटी रुपये दिले जात होते. आता ९ कोटी रुपये खर्च होत आहे. शहरातील कचऱ्यात मोठ्या प्रमाणात भंगार जमा होतोय. त्यातून संबंधित कंत्राटदाराला दररोज आठ ते दहा लाख रुपये मिळत असल्याचा आरोप विजय औताडे यांनी केला.

घनकचरा विभागाचे नंदकिशोर भोंबे यांनी सांगितले की, शहरात कचरा विलगीकरण वाढल्याने भंगाराचे प्रमाणही वाढले असून, या प्रक्रियेत संपूर्ण पारदर्शकता आणण्यासाठी आता रोजच्या भंगाराचे ई-ऑक्शन केले जाईल. याशिवाय कचऱ्यातील कोणकोणत्या गोष्टीला बाजारात मागणी आहे, याचा अभ्यास केला आहे. त्यानुसार कचरा विकला जाईल. बीपीसीएल कंपनी स्वखर्चाने शहरात एक मोठा प्रकल्प उभारणार आहे. ओल्या कचऱ्यापासून सीएनजी तयार करून विक्री केली जाईल. यातूनही मनपाला आर्थिक फायदा होणार आहे.

# नेत्रशल्यचिकित्सा विभागामार्फत राबिवण्यात येणारे उपक्रम कौतुकास्पद-अधिष्ठाता डॉ. सुक्रे

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (प्रतिनिधी) - घाटी रुग्णालय हे सर्वसामान्यांचे रुग्णालय म्हणून ओळखले जातो. येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णांला चांगली रुग्णसेवा व दर्जेदार उपचारासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. वर्षभर नेत्रशल्यचिकित्सा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, रुग्णसेवा व जनजागृतीपर उपक्रम कौतुकास्पद असल्याचे गौरवोदगार घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी काढले. नेत्रविभाग अधिक प्रगत व अत्याधुनिक करण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल. विभागासाठी लवकरच सुमारे १४ कोटी रुपयांची विविध अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

या निमित्त आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनानंतर त्यांनी पोस्टर व रांगोळी प्रदर्शनाचे अवलोकन करून सहभागींच्या कल्पकतेचे व जनजागृतीपर संदेशांचे कौतुक केले. नवनवीन उपकरणांमुळे विभागातील निदान, उपचार व शस्त्रक्रिया सुविधा अधिक सक्षम होऊन रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यास मदत होईल, असे डॉ. सुक्रे यांनी नमूद केले. घाटीच्या नेत्रशल्यचिकित्सा विभागातर्फे ओपीडी १०७ येथे नेत्रदान पंधरवड्याचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. दरवर्षी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत नेत्रदानाविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने नेत्रदान पंधरवडा साजरा करण्यात येतो. याप्रसंगी नेत्रदान जनजागृतीपर पोस्टर व रांगोळी प्रदर्शन तसेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नेत्रशल्यचिकित्सा विभागप्रमुख प्राध्यापक डॉ. अर्चना पाटील वरे यांनी आपल्या मनोगतात नेत्रदानाचे महत्त्व विशद केले. कॉर्नियल अंधत्वामुळे दृष्टी गमावलेल्या व्यक्तींना नेत्रदानामुळे पुन्हा दृष्टी मिळण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे समाजातील अधिकाधिक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करून या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

पोस्टर व रांगोळी स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून जीवरसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिल्पा आसेगावकर, बालरोग विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. स्मिता मुंदडा, शल्यचिकित्सा विभागाच्या प्राध्यापक डॉ. अनिता कंडी-गिते, नेत्ररोग विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. संगीता पाटील यांनी काम पाहिले. स्पर्धेतील उत्कृष्ट पोस्टर व रांगोळींची निवड परीक्षकांनी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉ. वैशाली उने-लोखंडे यांनी केले. या कार्यक्रमास नेत्रशल्यचिकित्सा विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. तपन जक्कल, सहाय्यक प्राध्यापक डॉ. महेश सोनपेठकर, डॉ. अनुपमा कोकाटे, डॉ. सनीरा वळसे, डॉ. सोहम पाल व डॉ. इमरान खान, तसेच विभागातील वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी डॉक्टर उपस्थित होते. यावेळी उपअधिष्ठाता डॉ. के. डी. गर्कल, डॉ. विनोद मुंदडा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, वार्धक्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. शैलजा राव, स्त्रीरोग विभागाच्या प्राध्यापक डॉ. सोनाली देशपांडे, मेट्रन संजीवनी गायकवाड-गवळी यांच्यासह सर्व विभागांचे प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेत्रशल्यचिकित्सा विभागाच्या कनिष्ठ निवासी डॉ. सोनिया हाके यांनी केले, तर सहाय्यक प्राध्यापक डॉ. सरोश सय्यद यांनी उपस्थितांचे आभार मानले.

(पान १ वरुन)

## नेपाळमध्ये भोटेकोशी नदीला...

पाण्याचा स्तर अचानक काही मिनिटांत प्रचंड वाढला. या महाप्रलयात १००० हून अधिक नागरिक वाहून गेल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. उत्तरगया ग्रामीण नगरपालिकेच्या उपाध्यक्षा चमेली गुरुंग यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'स्याफ्रुबेसी, बेत्रावती, मैलुंग, सालेतार, शांती बाजार, परेबेसी, खाल्टी बस्ती, सोले, त्रिशुली आणि बत्तर या नदीकाठच्या वस्त्यांना पुराचा सर्वांत मोठा फटका बसला असून प्रचंड जनजीवन विस्कळीत झाले आहे.'

नेपाळ लष्कर आणि आपत्ती व्यवस्थापन पथकांकडून बाधित भागात युद्धपातळीवर बचावमोहीम राबवली जात आहे. पुराचे अनेक थरकाप उडवणारे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. लष्कराचे प्रवक्ते राजाराम बस्नेत यांनी सांगितले की, 'पूरग्रस्त भागातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी लष्कराची हेलिकॉप्टर पाठवण्यात आली. मात्र, संपूर्ण परिसरात प्रचंड प्रमाणात पाणी साचल्यामुळे हेलिकॉप्टर खाली उतरू शकली नाहीत.' दरम्यान, प्रशासनाकडून नदीकाठच्या सर्व वस्त्यांमधील नागरिकांना तातडीने सुरक्षित आणि उंच ठिकाणी स्थलांतरित होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नेपाळमधील या महापुराचा परिणाम भारतावरही होण्याची शक्यता आहे. नेपाळमधील त्रिशुली नदीच्या पाण्याच्या प्रवाहात प्रचंड वाढ झाली आहे. हीच नदी पुढे नेपाळमध्ये नारायणी नदीला जाऊन मिळते आणि भारतात प्रवेश केल्यानंतर तिला 'गंडक नदी' म्हणून ओळखले जाते. गंडक नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होण्याची शक्यता असून भारतातील विशेषतः बिहार राज्याच्या सीमावर्ती जिल्ह्यांमधील प्रशासनाला आणि नागरिकांना सतर्क राहण्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

नेपाळमधून येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळे पुढील ४८ तास अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. पाण्याचा प्रवाह वाढल्याने गंडक आणि गंगा नद्यांची पाणी पातळी वेगाने वाढू शकते. प्रशासनाने नदीकाठावर राहणाऱ्या लोकांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. या संभाव्य पुराचा परिणाम पश्चिम चंपारण, पूर्व चंपारण, गोपालगंज, सिवान, सारण, मुझफ्फरपूर आणि वैशाली जिल्ह्यांवर होऊ शकतो. गंडक आणि गंगा नद्यांच्या काठावरील सखल भागांना पाणी शिरण्याचा विशेष धोका आहे.

दरम्यान, उत्तर प्रदेशातील बहराइचमध्ये, नेपाळमधून पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून आलेले पाच जंगली हत्ती घाघरा बॅरेजपर्यंत पोहोचले. या कळपात तीन बछड्यांचाही समावेश आहे.

## एमपीएससी पेपरफुटी प्रकरणी...

तपासात एका कथित प्रेमप्रकरणाचा धागा समोर आल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून दिली जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, एका उमेदवाराला परीक्षेत यश मिळवून देण्यासाठी तिच्याशी संबंधित व्यक्तीने एमपीएससीतील कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांशी संपर्क साधल्याचा संशय आहे. याच माध्यमातून प्रश्नपत्रिका मिळवून देण्यात आल्याचा प्राथमिक तपासातील दावा आहे. विशेष म्हणजे, आतापर्यंतच्या तपासानुसार फुटलेला प्रश्नसंच मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांमध्ये वितरित झाल्याचे स्पष्ट झालेले नसून तो एका उमेदवारापर्यंत पोहोचल्याची माहिती समोर आली आहे.

मात्र, एका उमेदवाराला प्रश्नपत्रिका मिळाल्याचा संशय असला तरी संपूर्ण परीक्षेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने आयोगाने परीक्षा रद्द केली. त्यामुळे पेपरफुटीचा गैरफायदा न घेतलेल्या शेकडो उमेदवारांनाही त्याचा फटका बसला आहे. या कथित प्रेमप्रकरणाची नेमकी भूमिका काय होती, संबंधित व्यक्तींमध्ये आर्थिक व्यवहार झाला होता का आणि पेपर मिळवण्यासाठी कोणाला किती पैसे देण्यात आले, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे.

## एमपीएससी अध्यक्ष हे मोठ्या...

गरजा मारून, कुठूनतरी उसने पैसे आणून तुम्हाला शिकण्यासाठी इथे पाठवतात. तुमच्या शिक्षणाची फी भरतात. तुमची आणि तुमच्या आई-वडिलांची ही स्वप्ने अशी पेपरफुटीमुळे धुळीस मिळवणे हे पाप आहे. तुम्हाला न्याय मिळावा म्हणूनच आम्ही हा लढा उभा केला आहे.'' ''मी जेव्हा बोलतो तेव्हा पुराव्यांसकटच बोलतो. पण मी आवाज उठवला की मला जेलमध्ये टाकण्याची धमकी दिली जाते.''

''एमपीएससीचे अध्यक्ष आणि सचिव यांनी या गैरप्रकारांची नैतिक जबाबदारी घेऊन तातडीने राजीनामा द्यावा. जर त्यांनी वेळेत राजीनामा दिला नाही, तर येत्या १ तारखेला आम्ही आयोगाच्या कार्यालयाबाहेर तीव्र आंदोलन करू आणि त्यांना जाब विचारायला तिकडे येऊ.'' असे ते म्हणाले.

## कुंभमेळ्याला ३५ हजार कोटी,...

मिळालेल्या माहितीनुसार, रुग्णालयातील व्हेंटिलेटर चीनमधून मागवले असून ते डुप्लिकेट असू शकतात. हेच व्हेंटिलेटर पीएम केअर फंडातून आले आहेत का? याची तातडीने चौकशी करून ते फेकून द्या आणि नवीन व्हेंटिलेटर लावा. अमरावतीसाठी मंजूर झालेल्या मेडिकल कॉलेजच्या जागेवरून सत्ताधारी आमदारांमध्येच वाद सुरू आहेत. प्रत्येकाला कॉलेज आपल्या सोयीच्या जागी आणि जमिनीचे भाव वाढवण्यासाठी हवे आहे. गरिबांच्या जिवाची कुणालाही पर्वा नाही.''

## सुट्या तेल विक्रीवरील सरसकट...

दिले आहेत. म्हणजेच, राज्यात सुट्या खाद्यतेलाची विक्री पूर्णपणे बंद करण्याऐवजी आता त्यासाठी काही स्पष्ट नियम आणि गुणवत्ता निकष निश्चित केले जाण्याची शक्यता आहे.

खाद्यतेल किराणा दुकानातून किंवा तेल विक्रेत्याकडून ग्राहकांना पॅकिंगशिवाय कमी-अधिक प्रमाणात विकले जाते, त्याला सामान्यतः 'सुटे तेल' असे म्हटले जाते. अनेक ग्राहक आपल्या आर्थिक क्षमतेनुसार किंवा रोजच्या गरजेनुसार तेल विकत घेतात. मात्र, अशा तेलाच्या बाबतीत ते नेमके कुठून आले, त्याची गुणवत्ता काय आहे, त्यात कोणतीही भेसळ आहे का आणि ते किती काळ साठवून ठेवण्यात आले आहे, याची खात्री ग्राहकांना करणे तुलनेने कठीण असते. अन्न व औषध प्रशासनाच्या तपासण्यांमध्ये काही ठिकाणी चुकीचे लेबलिंग, तेलात स्वस्त तेलांची भेसळ, आवश्यक परवाना नसताना व्यवसाय आणि अयोग्य पद्धतीने तेलाची साठवणूक यांसारख्या बाबी आढळल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे ग्राहकांना सुरक्षित आणि दर्जेदार खाद्यतेल मिळावे, या उद्देशाने प्रशासनाने सुट्या तेलाच्या विक्रीविरोधात कडक भूमिका घेतली. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत तपासणी मोहीम सुरू आहे. हॉटेल, रेस्टॉरंट, किराणा दुकाने आणि अन्य खाद्य व्यवसायांची तपासणी केली जात आहे. याच मोहिमेत सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीकडेही प्रशासनाने लक्ष केंद्रित केले. मात्र, सुट्या तेलावर सरसकट कारवाई झाल्यामुळे छोट्या दुकानदारांचा व्यवसाय अडचणीत येत असल्याच्या तक्रारी पुढे आल्या. विशेषतः ग्रामीण भागात तसेच कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांमध्ये ग्राहक एकावेळी मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करण्याऐवजी आपल्या दैनंदिन गरजेनुसार कमी प्रमाणात तेल घेतात. त्यामुळे प्रशासनाची कारवाई योग्य असली तरी त्याची अंमलबजावणी करताना सामान्य ग्राहक आणि छोट्या व्यापाऱ्यांचा विचार करावा, अशी मागणी मंत्रिमंडळात करण्यात आली.